**SL. No. : DD**

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 64 ]
Total No. of Questions : 64 ]

**CCE PR**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 15. 06. 2017 ] [ Date : 15. 06. 2017

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 09-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

## विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 64 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तूनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER

प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा

Tear here



https://www.karnatakaboard.com/

## विभाग - A

### ( गद्य पद्यांशावर आधारित )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा : 16 × 1 = 16

1. स्वामीनी हा दृष्टांत म्हाईंभटास कोणत्या गावात सांगितला ?
2. सर्वांसाठी विषयव्यवस्था कोण करतो ?
3. वसईवर कोणाचा अंमल होता ?
4. 'हाऊस वाइव्हज' या संस्थेची स्थापना केव्हा झाली ?
5. संध्याकाळो लेखकाने आईला कोणती बातमी सांगितली ?
6. 'आई समजून घेताना' या पाठाचे मूल्य काय आहे ?
7. किराणा घराण्याचे संस्थापक कोण ?
8. गंगूबाईना शारदांबेच्या अंगावरचे वस्त्र कुणी दिले ?
9. कल्पतरू कोणत्या इच्छा पुरवितो ?
10. रूक्मिणीच्या गुरूंचे नाव काय ?
11. माहेरवाशीण आईच्या हातचे कोणते जेवण जेवणार आहे ?
12. बुधवारी काकूबाई कोठे गेल्या ?
13. दान-धर्माची सुरूवात कोठून व्हावी ?
14. कावळ्याने कोणता शकुन सांगावा अशी कवीची इच्छा आहे ?
15. केशवसुतांची मुळची कविता कोणती ?
16. पृथ्वीच्या अंतरी कोणती ज्योत जागी आहे ?



https://www.karnatakaboard.com/

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : $13 \times 2 = 26$

17. फिरंग्याची बायको पाहून श्रीमंत काय म्हणाले ?

18. "विठया, बाळ्या, तुझा पुनर्जन्मच झाला म्हणायला हरकत नाही." संदर्भासह स्पष्ट करा.

19. जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्ठी कारणीभूत होत्या ?

20. संत ज्ञानेश्वरांची माहिती लिहा.

21. "जातील कधी हे आई ? घरदार न याना कांही ?" संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

22. सगळे ऋतू त्यांच्या साठी काय आणतात ?

23. आंधळ्यानी हत्तीचे वर्णन कसे केले आहे ?

24. जपानी स्त्रिया कोणकोणती कामे करतात ?

25. लेखकाने कोणता मनसुबा केला होता ?

26. आईचा चेहरा गंभीर का झाला ?

27. श्रीगुरु कोणती इच्छा पुरवितात ?

28. परार्थीचा आप्तविस्तार कसा असतो ?

29. माहेराला 'गोकुळ' का म्हटले आहे ?



https://www.karnatakaboard.com/

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 10 × 3 = 30

30. 'शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

31. पावसाळ्याचा हिशेब लेखकाने कसा घातला आहे ?

32. लेखकाचा उत्साह का कळजून गेला ?

33. तिसरी वाटणी कुणी मागितली ? का ?

34. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरू काय-काय करतो ?

35. समाजसेवक कोणते काम करतात ?

36. 'धुळीचेच आहे मला भूषण' असे पृथ्वी का म्हणत आहे ?

37. 'धरण' या कवितेतील स्त्रीच्या परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

38. धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात वातावरण कसे होते ?

39. आपण श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रूक्मिणी त्याला कसे सांगते ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : 5 × 4 = 20

40. 'हिरवे सांगाती' या पाठात आलेल्या सर्व वृक्षांची वशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

41. पतिच्या मृत्यूनंतर टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईना कोणकोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

42. भारत कशाप्रमाणे असावा अशी संत तुकडोजीनी अपेक्षा केली आहे ?

43. 'सत्कार' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

44. पुढील कविता पूर्ण करा :

झोळी झाडाला ......................................................

..................................................................

..................................................................

.............................................. कपाशी फुलते.



https://www.karnatakaboard.com/

## विभाग - B

### ( व्याकरणावर आधारित )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10

45. 'महिलाश्रम' ही .................. संधी आहे.

(अ) व्यंजन संधी (ब) स्वर संधी

(क) विसर्ग संधी (ड) यापैकी कोणतेही नाही.

46. खालील पैकी द्वितीयाचे विभक्ती प्रत्यय ओळखा.

(अ) नो (ब) ऊन, हून

(क) स, ला, ना, ते (ड) त, ई, आ.

47. 'मधुने आईसक्रिम खाल्ला.' हे या प्रयोगाचे उदाहरण आहे.

(अ) भावे प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग

(क) कर्तरी प्रयोग (ड) यापैकी कोणतेही नाही.

48. 'तो अभ्यास करतो.' या वाक्याचा काळ ओळखा.

(अ) साधा वर्तमान काळ (ब) साधा भूतकाळ

(क) अपूर्ण वर्तमान काळ (ड) पूर्ण वर्तमान काळ.

49. गरज ही शोधाची .................... आहे. ही म्हण पूर्ण करा.

(अ) ममता (ब) आवश्यकता

(क) संपत्ती (ड) जननी.

50. 'तोंडपाठ' हा या समासाचा प्रकार आहे.

(अ) अव्ययीभाव (ब) द्वन्द्व

(क) तत्पुरुषी (ड) बहुव्रिही.

51. 'श्रम न करता खाणारा' याला एक शब्द हा आहे.

(अ) आळशी (ब) कष्टाळू

(क) ऐतखाऊ (ड) झोपाळू.



https://www.karnatakaboard.com/

52. रमेश <u>जोराने</u> पळतो. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

(अ) क्रिया विशेषण (ब) क्रियापद

(क) नाम (ड) शब्दयोगी अव्यय.

53. 'आण्णा' हा शब्द या भाषेतून आला आहे.

(अ) संस्कृत (ब) कन्नड

(क) हिंदी (ड) पोर्तुगीज.

54. पूर्ण विरामासाठी हे विरामचिन्ह वापरतात.

(अ) . (ब) :

(क) ! (ड) ' '

VI. खालील दोन शब्दांतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा : 4 × 1 = 4

55. तुझे गाव कोणते ? प्रश्नार्थी वाक्य : : माझे गाव मोहोळ आहे : ................

56. पवन : वारा : : असूर : ................

57. कवि : पुल्लिंगी : : कवयित्री : ................

58. रात्र : दिवस : : विधुर : ...............

VII. सूचने प्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 3 × 2 = 6

59. 'सावळाच रंग तुझा पावसाळि नभापरि' अलंकार ओळखून लक्षणं सांगा.

60. 'मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढ मासी' वृत्त ओळखून, गण पाडून लक्षणं सांगा.

61. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(i) तारीफ करणे —

(ii) बेत करणे —



https://www.karnatakaboard.com/

## विभाग - C

## ( लेखन विभाग रचनेवर आधारित )

VIII. 62. खालील पैकी कोणत्याही **एका** विषयावर कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3

(i) प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे.

(ii) घरोघरी मातीच्या चुली.

IX. 63. संकटकाळी अतिशय धैर्य दाखवून केलेल्या शौर्याबद्दलचे राष्ट्रपती पुरस्कार मिळविलेल्या मित्राचे अभिनंदन पत्र लिहा. 5

**किंवा**

तुमच्या घरच्या आजूबाजूला फारच घाण साचलेली आहे. तेव्हा गटारीच्या स्वच्छतेसाठी नगरपालिकेला पत्र लिहून कळवा.

X. 64. खालील पैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा : 1 × 5 = 5

(i) झाडे लावा - झाडे वाचवा.

(ii) स्त्री-पुरुष समानता.

(iii) जनसेवा हीच ईश्वर सेवा.



https://www.karnatakaboard.com/

https://www.karnatakaboard.com/